Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2408II04V12P0013

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(IV), Volume–XII

# अण्णा भाऊ साठे आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ

**डॉ. विलास आत्माराम देऊलकर**
सहयोगी प्राध्यापक
बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय, वेंगुर्ला
जिल्हा - सिंधुदुर्ग पिन नं. ४१६ ५१६
इमेल - vadewoolkar@gmail.com

**सारांश :-**

भारत स्वतंत्र झाल्यावर राज्य निर्मितीसाठी आयोग स्थापन करण्यात आले. या आयोगाने मुंबई महाराष्ट्र तोडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ती इथल्या मराठी लोकांनी या निर्णयाविरोधात संयुक्त महाराष्ट्र चळवळ उभारली होती. त्यात राजकीय नेते, पत्रकार, शाहीर व विद्यार्थी सहभागी होते. त्यात अण्णाभाऊ साठे सुद्धा सहभागी होते. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे रणशिंग फुंकले. लालबावटा कलापथक त्यांनी स्थापन केले. या पथकाने शाहीरी, तमाशा, लोकनाट्य सादर करून जनमत निर्माण केले. गावखेड्यात ही चळवळ डफाच्या थापेवर पोहोचली होती. लालबावटा या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. अण्णाभाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्राला विरोध करणाऱ्या लोकांचा खरपुस समाचार घेतला. अण्णाभाऊ साठे त्या काळातील महत्त्वाचे प्रसार माध्यम ठरले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णाभाऊंनी सिंहाचा वाटा उचलला. त्यांच्या कार्याचा विसर आजच्या पिढीला पडलेला दिसतो. म्हणूनच त्यांच्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदानाचा अभ्यास करण्यात आला.

**की वर्ड :-** संयुक्त महाराष्ट्र चळवळ, अण्णाभाऊ साठे, शाहीर

## प्रस्तावना -

भारताच्या इतिहासात सयुक्त महाराष्ट्र चळवळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे . १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. अण्णा भाऊ साठे यांनी सयुक्त महाराष्ट्र आंदोलनात दिलेले योगदान फार महत्त्वाचे आहे. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये जन्म घेतलेल्या या साहित्य रत्नाने अखंड देशाची सेवा केली. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीय कृतिशिलतेवर आधारलेले होते. ते मानवतावादी लेखक होते. कष्टकरी, दलित, शोषित, पीडित यांच्या शोषणा विरोधी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. त्यांनी आपल्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे, लोकनाटय, कविता, लावण्यामधून शेतकरी मजुरांचे जीवन, कामगारांची पिळवणुक, अंधश्रदधा, रुढी, अनिष्ट प्रथा, परंपरा इ. बाबत जनजागृती करण्याचे मोलाचे कार्य अण्णाभाऊ साठेंनी केले. स्वतंत्र भारतातील अनेक चळवळीमध्ये संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही एक मोठी चळवळ होती. या काळात मनोरंजनातून लोकशिक्षण आणि जनजागृती करून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकमत जागृत करण्याचे महान कार्य लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत शाहीरांची वाणी व लेखणीने समाजमनात क्रांतीच्या ठिणग्या उभ्या केल्या. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अण्णाभाऊ साठे यांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

## संयुक्त महाराष्ट्र लढ्याची पार्श्वभूमी -

ब्रिटिशांनी आपल्या राज्यकारभाराच्या सोयीसाठी ब्रिटिश भारताची विभागणी वेगवेगळया प्रांतामध्ये केली होती. इ. स १९६० च्या राष्ट्रीय क्राँग्रेसच्या नागपूर येथील अधिवेशनामध्ये महात्मा गांधी, लोकमान्य टिळक वगैरे नेत्यांचे भाषावार प्रांतरचने बाबत एकमत झाले होते. परंतु स्वातंत्र्यानंतर याचा पंडित नेहरु यांना राष्ट्राच्या एकात्मतेला धोका वाटू लागला. यामध्ये सर्वात मोठा विरोध हा अमराठी भांडवलदारांना मुंबई महाराष्ट्राला देण्याबाबत होता. इ. स १९३८ मध्ये रावसाहेब पटवर्धन व इ. स १९४० मध्ये गजानन त्र्यंबक माडखोलकर यांनी मराठी भाषिक प्रदेशांच्या एकिकरणाचा विषय उपस्थित केला होता. माडखोलकरांनी तर महाराष्ट्रातील भूमीपुत्रांच्या ताब्यात महाराष्ट्रातील व्यापार व उद्योग नसल्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेसचे पुढारी एकाकीकरणासाठी प्रयत्न करत नसल्याचा उल्लेख केला. एवढेच नव्हे तर इ. स १९४६ मध्ये झालेल्या साहित्य संमेलनात त्यांनी हा विषय लावून धरला व त्यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र एकीकरण समिती स्थापन झाली. संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारे तीन ठराव साहित्यिकांनी पाठवले त्याला राजकीय नेत्यांनी पाठिंबा दिला. इ. स १९४६ रोजी भरलेल्या महाराष्ट्र एकीकरण परिषदेत डाव्या पक्षांकडून एकीकरणाला पाठिंबा मिळाला, परंतु काँग्रेसचे मोठे पुढारी स.का.पाटील यांनी मुंबई महाराष्ट्रास देण्यास विरोध केला.

इ. स. १९४८ साली दार कमिशनने संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला विरोध केला. जे.व्ही.पी. समितीने महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या मागणीला सुद्धा विरोध केला एवढेच नव्हे तर वल्लभभाई पटेल यांनी ही विरोध केला.

## फाजलअली आयोग -

फाजलअली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुनर्रचना आयोगाची नियुक्ती इ.स. १९५३ रोजी झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या वतीने एस.एम.जोशी, धनंजय गाडगीळ सह इतरांनी आयोगासमोर बाजू मांडली व १९५५ रोजी आयोगाने निवाडा जाहीर केला. पुनर्रचनेबाबत पायाभूत तत्वे सर्वांना सारखी लागू केली गेली नाही त्यात मोठी विसंगती होती. मुंबई प्रांतात गुजराती भाषिकसौराष्ट्र सामाविष्ट करून मराठी भाषिक विदर्भ, बेळगाव, कारवार बाहेर ठेवले गेले. मुंबईच्या विकासासाठी मुंबईला गुजरातपासून वेगळे ठेवणे योग्य नाही. तसेच बेळगाव भाग कर्नाटकाशी आर्थिकदृष्ट्या जोडला असल्याने तसेच विदर्भ महाराष्ट्रात घेतल्यास नागपूर शहराचे महत्त्व कमी होईल असे अहवालात नमूद केले. आयोगाला द्वैभाषिक मराठी भाषिकांची संख्या गुजराती भाषिकांपेक्षा ज्यादा होऊ द्यायची नव्हती असेच या विसंगतीचे कारण असावे.

## लालबावटा कलापथक व संयुक्त महाराष्ट्राचा लढा

लाल बावटा कलापथकाची स्थापना इ.स.१९४४ मध्ये शाहीर, अमरशेख, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर दत्तात्रय गवाणकर यांनी केली होती. या कलापथकात सहा लोक होते. या कलापथकाच्या माध्यमातून समाजामध्ये प्रबोधन सुरू होते. गुजरातमध्ये मुंबई जाईल अशी चिन्हे दिसू लागली. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीने संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू केली. त्यात लालबावटा कलापथकाने उडी घेतली. लालबावटा कला पथकाने सन १९५० ते १९६० या काळात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची हाक बुलंद केली. त्यांचे नेतृत्व अण्णाभाऊ साठे यांनी केले. अण्णांनी अन्यायाच्या विरोधात लढा दिला. या लढ्यामध्ये त्यांचे मित्र शाहीर शेख, शाहीर दत्तात्रय गवाणकर यांनी खूप मेहनत घेऊन अख्खा महाराष्ट्र जागृत केला. त्यामुळे या लढ्याला सर्वसामान्य लोकांचा सहभाग मिळाला. एवढेच नव्हे तर शाहीरांनी संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सर्वसामान्य पर्यंत नेऊन पोहोचवला. तर आपल्या पोवाड्याच्या माध्यमातून महाराष्ट्राबद्दल अस्मिता जागृत केली.

अण्णांनी माझी मुंबई या लोकनाट्यामध्ये मुंबई ही महाराष्ट्राची आहे असे ठामपणे सांगण्याचा प्रयत्न केला. या लोकनाट्यात विष्णू हा मराठी कामगार व मुनिमजी हा गुजराती बनिया यांच्यातील संवाद

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(IV), Volume–XII

रेखाटलेला आहे. त्यांच्यात मुंबई कोणाची या विषयाच्या जुगलबंदीचा आशय रेखाटलेला आहे. ज्याप्रमाणे पंखाशिवाय गरूड नाही, नखाशिवाय वाघाचे अस्तित्व नाही तशी मुंबई शिवाय महाराष्ट्राची कल्पनाच होऊ शकत नाही. अण्णांनी संयुक्त महाराष्ट्र लढ्यात आपली लेखणी झिझवली. आणि वाणीचा शस्त्रासारखा वापर केला. शाहीरीतून संघर्षाच्या ठिणग्या पेरणाऱ्या अण्णांची धास्ती घेतलेल्या सरकारने त्यांच्या कार्यक्रमावर बंदी घातली परंतु त्यांनी मोठ्या चातुर्याने तमाशाचे नामांतर लोकनाट्य असे केले.

## संयुक्त महाराष्ट्राची स्थापना -

अशा पद्धतीने बेळगाव, कारवार, निपाणी, डांग, उबरगाव या भागातील मराठीजनांचे दु:ख अण्णांनी मांडले होते. सयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सर्वांनी एकतेने लढा चालू ठेवावा असे आवाहन त्यांनी केले. अखेर सयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपुढे केंद्रसरकार नमले. २८ मार्च १९६० रोजी गृहमंत्री गोविंद वल्लभपंथ यांनी लोकसभेत व्दैभाषिक राज्य भंग करण्याचे बील मांडले. २१ एप्रिल रोजी राज्यसभेने आणि २३ एप्रिल रोजी राज्यसभेने या बिलाला मंजूरी दिली व त्यानुसार १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे मुंबई राजधानी असणारे महाराष्ट्र राज्य स्थापन केले.

अण्णाभाऊंनी मॅक्सिम गॉर्कीच्या वाडमययाचा सखोल अभ्यास केला, कार्लमार्क्स पचवला, मराठीत उपलब्ध असलेल्या साहित्यांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला व मुळातच त्यांना प्रतिभेचे देणे असल्याने साम्यवादी तत्वज्ञानाच्या प्रभावाने त्यांची शाहिरी , लेखणी, कथा, कादंबऱ्या हे अधिकच वृद्धिंगत झाले. अण्णा भाऊ साठे हे १९५८ साली मुंबई येथे पार पडलेल्या दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. अण्णाभाऊंनी जीवनात अतिशय दु:ख भोगले. मी जे जीवन जगतो, पहातो, अनुभवतो तेच मी लिहितो. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही. अशी प्रांजळ कबूली त्यांनी दिली. अण्णा भाऊ हे थोर साहित्यिक व कलावंत होते.

एकूणच महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच एकत्रित राजकीय चळवळ उभी करण्यासाठी शाहिरी या लोककलेचा उपयोग अण्णाभाऊ साठे यांनी केला. शाहिरी या लोककला प्रकारातून राजकीय, सामाजिक व वैचारिक प्रबोधन घडवून सयुक्त महाराष्ट्र चळवळ यशस्वी करुन दाखवली हे सत्य स्वीकारावे लागेल. अण्णाभाऊंसारखा अष्टपैलू नेत्यांच्या लढावू वृत्तामुळे सयुक्त महाराष्ट्राची चळवळ व्यापक व शक्तीशाली आणि यशस्वी झाली.

## समारोप :-

कवी, लोकशाहीर, कथाकार, कादंबरीकार, नाटककार, चळवळीत काम करणारा कार्यकर्ता, लोकनाट्याचे जनक, पत्रकार, निर्माता, व माणसांवर उत्कट प्रेम करणारा माणूस असे विविध पैलू, अण्णाभाऊच्या व्यक्तीमत्वात होते. या अर्थाने अण्णाभाऊ साठे हे बहुआयामी अष्टपैलू ठरतात. सयुक्त महाराष्ट्र आंदोलनामुळे जे धगधगते यज्ञकुंड महाराष्ट्रात पेरले होते त्या यज्ञकुंडात एक अग्रणी शिलेदार म्हणून अण्णाभाऊ साठे या लोकशाहीराची नोंद इतिहासात घ्यावी लागेल. त्यांनी महाराष्ट्राच्या निर्मितीची प्राणप्रिय स्वप्न मूर्त स्वरूपात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली व मराठी भूमिपुत्रांमध्ये चैतन्य निर्माण केले. लालबावटा कलापथकाच्या माध्यमातून न्याय, समता, एकता या मुद्द्यांची जोपासना केली व संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाकरिता राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक प्रबोधन केले. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला.

## संदर्भसूची :-

१. कोरडे बजरंग : (साहित्य अकादमी) भारतीय साहित्याचे निर्माते अण्णाभाऊ साठे २०११
२. चौगुले रणजित : अण्णाभाऊ साठे आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ लेखसंग्रह
३. डॉ. अनिल कठारे : महाराष्ट्राचे समाजसुधारक विद्याबुक्स पब्लिर्शस औरंगाबाद २०१४
४. साठे शंकरभाऊ : माझा भाऊ अण्णाभाऊ सुगावा प्रकाशन पुणे प्रथमाआवृत्ती १९८०
५. पोतदार माधव : संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शाहिरांचे योगदान अनुबंध प्रकाशन पुणे २०१०
६. डांगळे अर्जून : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाड.मय मुंबई १९९८
७. गुरव बाबूराव : अण्णाभाऊ साठे समाजविचार आणि साहित्य विवेचन लोक वाड.मय गृह मुंबई २०१९